भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2017 ◑

AE 595706

प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
प.मु.वि.क ८०००९४
- 6 OCT 2017
सक्षम अधिकारी

श्री. प्र. ना. चिंचघरे

मा.पी.एम. आर.डी.ए.पुणे

यांचकडे सविनय सादर ------

हमीपत्र आज दिनांक इसवी ते दिवसी.

मी राउल बजाज राहणार ४ मलाबार कोर्ट पहिला मजला मलबार हिल्स मुंबई ४०000६ व्यवसाय व्यापार मी हमीपत्र लिहुन देतो की

१) मौजे पोमगाव ता.मुळशी जि.पुणे येथिल स.न.३०९ यांसी एकुण क्षेत्र ६000 चौ. मी.या मिळकतीमध्ये निवासी पध्दतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागा मालक म्हणुन आम्ही दाखल केला आहे.तुर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत कडुन पुरेसा पाणि पुरवठा उपलब्ध होवु शकत नाही.याची माहीती आम्हाला देण्यात आली आसुन याला पर्याय म्हणुन जागेवरील बोअरव्दारे पाणी उपलब्ध करूण देण्याची किंवा टॅकरव्दारे पाणी मिळवण्याची व्यवस्था करीत आहोतव त्या संबंधी आवश्यक त्या वरीष्ट भुवैज्ञानीक अधिकारी भुजल सर्व्हेक्षण आणी विकास योजना (G.W.S.& D.A.) या कार्यालया मार्फत किंवा तत्सम तांत्रीक सल्लागारामार्फतसदर जागी पाणी असल्याबध्दलचे प्रमाणपत्र आणुन देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारण राहील.

२) ईमारत पुर्ण झाल्यावर ईमारतीमधील निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे /ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दावाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने ईमारतीमधील रहिवासांच्या खर्चाने करून देण्यास तयार असुन त्याची सर्व जवाबदारी आम्ही या हमीपत्राव्दारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधीकरण पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणी पुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळयाचे विकीचे बुकींग करताना येणा-या करार नाम्यामध्ये पाणीपुरवठयाची वरील प्रमाणे सर्व वस्तुस्थिती विषेश बाब म्हणुन नमुद करूण घेण्याची जबाबदारी राहील जागेवरील परिस्थीतीची जाणीव नियोजीत गाळेधारकाना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे /ग्रामपंचायतचा पुरेसा पानी पुरवठा करूण देण्याची जबाबदारी राहील पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायतला तोषिश लागु देणार नाही.

५) टँकरव्दारा किंवा बोअरव्दारा मध्या मिळणा-या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोग शाळेतुन तपासुन आणने व त्या रिपोर्टनुसार पानी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल याची आम्ही काळजी घेऊ.

६) सदरची योजना संपुर्णरित्या पवर्तक /मालक या नात्याने आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक /प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पाना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेऊ.

७) ते हमीपत्र आमचे वालीवारसावर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉट मधील संदर्भातील कोणत्याही होणा-या करारमध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणुन समजण्यात येईल.

वरील हमीपत्र आम्ही राजीखुशीने दिनांक / /२०१७ रोजी लिहुन दिला आहे.

हमीपत्र लिहुन देणार,

पुणे

दिनांक :-

१) श्री. राउल बजाज